Vol 2 Issue 6 March 2013

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

*Review Of Research*
Vol.2, Issue.6, March. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# *मराठी साहित्यातील दलित साहित्य प्रवाहाचा अभ्यास*

*किसन संदिपान पवार*

विज्ञान महाविद्यालय सांगोला.

*सारांश :*

आधुनिक मराठी साहित्यातील एक अल्पावधीत प्रकाशात आलेला वास्तवतेची नाळ जोडणारा महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून सामाजिक व वाङःमयीन अशी दूहेरी विचारातून पुढे आलेला दलित साहित्य प्रवाह एक महत्त्वाचा चर्चेचा विषय ठरला.

प्रस्तावना –

दलित याचा अर्थ जो मागास, पतित, दीनदुबळा असा अर्थ अपेक्षीत नाही. भारत देशाच्या समाजव्यवस्थेच्या चौकटीतून हा शब्द पुढे आलेला आहे. वर्णाश्रमव्यवस्थेतेने एका मोठया समूहाला विविध कारणांनी व परंपरांनी अस्पृश्य मानलेले आहे, साधे सुधे मानवी यांच्यापासून त्याना अलक काढले दलितत्वाचा शिक्का ठोकून पुरते नगण्य करून टाकले.

समाजाच्या अनेक पदरी जीवनानुभूतीचे चित्रण प्रतिभावंतांच्या अविष्कारातून शब्दशब्द केले जात असते. पण भारतीय साहित्यात दलित वर्गाच्या लौकिक आयुष्यातील फरफट आणि भावजीवनाची वाटतपुरत कधी ग्रंथबध्द झालीच नाही. विचारांध बनविणारी धर्माधिष्ठीत परंपरा दलित साहित्याने निग्रहाने नाकारली. हया अंधत्वाला त्याने ठामपणे नकार दिलातर मानव म्हणून नव्याने उभारणी धरताना म्हणून ते आकारू लागले. आपल्या सांस्कृतिक साध्याकडे वाटचाल करू लागले.

मानवी हक्क नाकारणाऱ्या चातुर्वर्ण्याकडे, त्याला पोसणाऱ्या धर्मबंधनाकडे आणि त्याचा मूळाधार असलेल्या माणसाला अगतिक ठरवणाऱ्या ईश्वराच्या आस्तीत्वाकडे संपूर्ण वैज्ञानिक, स्वाभाविक व मानवीय दृष्टीकोनातून पाहण्याची गरज निर्माण झाली. उद्दियमान होऊ पाहणाऱ्या मानव संस्कार घडविण्याची क्षमता असलेले दलित साहित्य बाळसे धरू लागले. साहित्याने जीवनाशी जीवनातून प्रतीत होणाऱ्या पण तरीही शब्दात न बांधता येणाऱ्या तरल भावस्पंदनाशी, मुल्यगर्भ वैचारिकतेने समांतर असलेच पाहिजे. ही निष्ठा बांधीलकी यातूनच उदभवली.

दलित आणि दलितेतर हे एकाच समाजाचे जरी घटक असलेतरी त्यांची जगे मूलतः भिन्नच आहेत. 1956 साली हे गृहीत धरूनच डॉ. आंबेडकरांनी धर्मातरांचे पाऊल उचलले. दलितेतरांच्या वैचारिक गुलामगिरीवर हा प्रत्यक्ष प्रहार होता. पण लवकरच डॉ. आंबेडकरांचे महानिर्वाण झाल्याने दलित समाजावरही मोठाच आघात झाला. अशा दूहेरी आघात प्रकियेतून दलित साहित्य उसळी घेऊन उभे राहिले.

नाकारलेल्या समूहमनाची संघावरती डॉ. आंबेडकरांच्या रूपाने प्रकट झाली होती त्यांच्या अष्टपैलू नेतृत्वाची धग अनेक क्षेत्रात दलितेतरानी अनुभवली, आपली सुखदुःखे आपल्या भाषेत बोलणारे लेखन झाले पाहिजे. असे विचार ते त्यांच्या वक्तत्वयांत मांडत ग्रंथांची भाषा जीवंत व नारळी पाण्याइतकी मधूर अशी असावयास हवी. या ग्रंथांच्या वाचनाने माणसांची झोप उडून जाऊन त्यांची विचारशक्ती जागृत झाली पाहिजे असे ते म्हणत. हाच दलित साहित्याचा उगमस्त्रोत म्हणावा लागेल.

प्रचलित व्यवस्थेच्या दावणीला बांधले गेलेले पारंपारिक निकष या साहित्याने नाकारले. ग्रंथप्रामाण्य, ईश्वर, स्थानसंध्या, जातीवाद आणि देह दंडन ही ध्वस्तपदाची लक्षणे धर्मकिर्ती या बुद्ध विचारवंताने सांगीतली आहेतच ते ओळखून हे लेखन अधिक संयतपणाने होऊ लागले. भक्तीच्या मुलाम्याने माणुसकीला किंमत येते असे नाही हे सूत्र स्मरणात ठेवून आरंभी ज्यांनी लेखन केले, त्यात किसन फागू बनसोडे हया नावाचा खास उल्लेख करावा लागेल.

हरिहरराव सोनुले, ना.रा.शेंडे, शंकरराव सुराडकर, चां.भ.खैर, मोडे, नामदेव व्हटकर, दा.ता.रूपवते, घनःश्याम तळवटकर इ अनेक लेखकांनी ठामपणे हा विचार सर्वत्र रूजविला.

या काळात महाराष्ट्रभर लोक जागृतीचे कार्य वेगाने घडले. शाहीर केरू अर्जून हेगडे, केरूबुवा गायकवाड, पतीत पावनदास, दीनबंधु गडपायले, वामन कर्डक, श्रावण यशवंते यांनी सर्व समाजमन आपल्या रसपूर्ण आवाहक गीतांनी घुसळून लखलखीन केले. सुख, समृध्दी, सभ्यता, समानता यांची स्वप्ने पाहात व महाराष्ट्राचे नंदनवन व्हावे अपेक्षा करीत आण्णाभाऊ साठे यांची लेखणी सरसावली, त्यांची ती शाहिरी त्यांच्या जिभेवर तलवारीप्रमाणे लखलखत होती. हे आण्णाभाऊंनी केलेले शाहिररावरील भाष्य त्यांच्याच लेखनाला चपखल बसते. 1959 साली अवतरलेली फकिरा ही त्यांची सर्वोत्तम कलाकृती बरबादया कंजारी (1960) आंबी (1961) माकडीचा माळ (1963) वारणेचा वाघ (1968) असे विपूल लेखन त्यांनी केले. पुढे त्यांच्या लेखनाला केवळ संख्यात्मक मूल्य उरले. त्यांच्या लेखन प्रपंचाचा मराठी कादंबरीच्या आढाव्यात नामोल्लेखही येऊ नये ही गोष्ट रूढ साहित्यविचार उघडा पाडणारी होती.

छलित साहित्यात वास्तव जीवनाचे ज्वलंत चित्रण फार मोठया प्रमाणातून प्रकट होण्याचा काठ म्हणजे 1960 नंतरचे लेखन, उपलब्ध साहित्यात खब्दांच्या खोडाबेडीत अडकलेली क्षीण रेखाटने आणि स्वाभुकवाच्या खोलीने अधांग बनलेली वेगवान शब्दांकने यांच्यात तीव्र स्पर्धा जाणवू लागली. शंकरराव खरात, हरिभाऊ पगारे, बंधु माधव, बाबुराव बागुळ, सुखराम हिवराळे, केशव मेश्राम, वामन होवाळ, नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, राजा ढावे, चोखा कांबळे, हिरा बनसोडे, भीमराव शिवराळे, सुरेखा भगत, योगीराज वाघमारे, त्र्यंबक सपकाळे, दया पवार, दत्ता भगत, वामद निंबाळकर, प्रल्हाद चंदवनकर, नरेंद्र शेलार, माधव कोंडविलकर, उमांकात रणधिर, अरूण कांबळे, अर्जून डांगळे, किसन बनसोडे असे आणि अनेक साहित्यीकम लेखन या काळात गुणवैशिष्याने पुढे आले.

शैध्दांतिक व लजि आाणि विविध वाङःमय प्रकारांनी दलित सहित्यात 1960 नंतरच्या काळात मोठीच भर पडली. मराठी वाङःमय विवेचकांना त्याची गंभीर नोंद घेवून त्याचे मूल्याकंन व्यासंगीपणे करण्याची अपरिहार्यता निर्माण झाली. म. भि. चिटणीस, म. ना. वानखडे, डी.टी. माने, ताराचंद खांडेकर, गंगाधर पानतावणे, राजा ढाले, यांनी दलित साहित्याच्या भविष्याची वेळोवेळी विवेचन चर्चा करून त्यास मौलिकता प्राप्त करून दिली.

## *मराठीतील नवसाहित्यात दलित साहित्य–*

नवसाहित्य चळवळीसकट मराठीतील कोणीत्याही साहित्यिक चळवळीने उडाली नसेल इतकी वादाची खळबळ दलित साहित्याने उडाली. नवसाहित्याच्या चळवळीची धार लौकरच सौम्य झाली. आणि ती स्थिरावून गेली. परंतू आरंभीच्या काळात दलित साहित्यामुळे उठणारी व्रीव आक्रमक प्रतिक्रीया आता उठत नसलीतरी त्याला अजूनही व्यापक प्रमाणात मान्यता मिळालेली नाही. मात्र त्या साहित्याची गंभीर चर्चाचिकित्या करणारे प्रवक्ते आता पुष्कळ आहेत. आणि चळवळीच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट म्हणजे त्यांच्यापेकी कितीतरी जण स्वतः दलित नाहीत, वाद विषय झालेल्या दलित साहित्याच्या मुळाशी दलितांची सामाजिक, आर्थीक परिस्थिती आहे त्याला राजकीय परिणाम प्राप्त होणे अपेक्षीत होते. पिढयानपिढया किंबहुना शतकानुशतके पशू सारखे लाजिरवाने जीवन जगावे लागल्याबद्दलच्या साचलेल्या क्रोधाचा उद्रेक म्हणजे हे साहित्य. हा क्रोध कधी कधी बेभान असतो, अविवेकी असतो, पण तो सच्चा आणि उत्स्फुर्स असतो. या क्रोधाने कविता, कादंबरी, आणि आत्मचरित्र या साहित्यप्रकारातील काही उत्कृष्ठ कलाकृतीना जन्म दिला आहे. दलितानींच आत्मचरित्र या साहित्य प्रकारातून सहज ओबडंते, कवितेत आत्मचरित्र कधीकधी उघड दिसते. परंतू बहुवंशी सभांव्य निर्माणक रसायनात विरघळलेले असते. दलित कवींनी लिहिलेले सगळेच काव्य विद्रोही नाही.

अनेक दलित कवितांतील उत्कटतेचे मूळ कवीच्या आत्मनिष्ठेतच आहे. ती उत्कठता सामाजिक ध्येयनिष्ठेतूनच आलेली आणलेली नाही. या बाबतीत केशव मेश्रांमाची कविता उदाहरण म्हणून सांगता येईल. दया पवार, नामदेव ढसाळ, अर्जून डांगळे आणि यशवंत मनोहर हे आणखी काही प्रमुख दलित कवी. दलित कादंबरीकार म्हणून सुध्दा केशव मेश्राम, वेगळे आहेत. म्हणजे असे की आपल्या दलितपणाच्या वैयक्तिक अनुभवातून ते कांदबरी ते कादंबरी निर्माण करीत नाहीत. बाबूराव बागूल मात्र तसे म्हणतात आत्मचरित्र हा दलित साहित्यातील अधिक परिचित साहित्य प्रकार त्यातील केवळ दारिद्रयाच्याच नव्हेतर अत्याचाराच्या आणि मानहानीच्या सत्यघटना इतक्या विलक्षण आहेत. कीं. बहुसंख्य कथा कांदबऱ्यांनी त्यांच्यापुढे ओषाळ व्हावे.

दारिंदययातून सुध्दा आनंदाच्या भावनेचा अर्क काढणे हा साहित्यिक संकेत परंतू हे दारिद्रय म्हणजे मध्यमवर्गाचे दारिद्रय दलितांच्या जवळपास येऊ शकत नाही. त्यातील काही घटना थोडया भडकपणे रंगवलेल्या वाटल्या तरी एक संवेदनाशून्य सोडला तर बाकीच्या वाचकांना त्या घटना निःसंशय आत्मशोधन करायला प्रवृत्त करतील. दया पवार, शंकरराव खरात, लक्ष्मण माने माधव कोंडीविलकर आणि प्र. ई. सोनकांबळे यांची आत्मचरित्रे विशेष प्रत्ययकारी आहेत.

या लेखनाच्या प्रभावामुळे एकूण साहित्यिक वातावरणातही काही बदल झाला आहे. केवळ दलितांच्या संमेलनातून नव्हेतर इतर साहित्यमेळाव्यातून सुध्दा दलित साहित्याच्या विविध पैलूवर चर्चा केली जाते. नियतकालिकेत सुध्दा दलित साहित्याची दखल घेतात. एक महत्वाचे मासिक दलितांकडून चालवले जाते. दति साहित्याला आता शैक्षणिक आणि अभ्यासक्रमिक मान्यताही मिळाली आहे. काही विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात विशेष अभ्यासासाठी दलित साहित्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहावर दलित साहित्य

चळवळीचे विविध परिणाम झाले आहेत. सूत्ररूपाने सांगायचेतर या चळवळीमुळे मराठी साहित्य काही प्रमाणात मुक्त होऊ शकले. आशय, अनुभवांची मांडणी, भाषा यांच्या संबंधातील भिडस्तपणा बाजूला पडला व जिवंत भाषेच्या जवळ जाण्याची थेट परिणाम साधण्याची जी धडपड चालली होती तिला नवे बळ मिळाले. झोपट्टीच्या चित्रणांत ज्या पध्दतीने शिव्याळ व शिवराळ भाषा एकूण भाषिक व्यवहारात खळबळ निर्माण करते व दलित लौकरच मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहाला मिळून जावू शकते असा विश्वास वाटतो.

*संदर्भ.*

1.मराठी वाङःमयाचा इतिहास खंड 7 वा (भाग 4 था) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे.
2.दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान बाबुराव बागुल
3.दलितांचे प्रबोधन– गंगाधर पानतावणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org